


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार ५ सप्टेंबर २०२४ | अंक २७० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# सगेसोयऱ्यांचा मुद्दा कुणामुळे रखडला?, मनोज जरांगे पाटील यांनी घेतलं राज्यातील सर्वात मोठ्या नेत्याचं नाव?

## निदान तुम्ही तरी असं बोलायला नको होतं

मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या विधानावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यांच्याबद्दल असं विधान करणं चुकीचं आहे. स्वत: तानाजी सावंत हे शेतकरी कुटुंबातून आलेले आहेत. त्यांनी तरी असं बोलायला नको होतं, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## पायाखाली घेतल्याशिवाय जमणार नाही

दरम्यान, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर तुम्ही कधी आंदोलन करणार? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांना करण्यात आला. त्यावर जरांगे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. 2024 मध्ये या सरकारला पायाखाली घेतल्याशिवाय पर्याय नाही. आता आम्ही जे सुरू केलंय तेच शेतकऱ्यांचं आंदोलन आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.



मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी पुढच्या महिन्यात पुन्हा एकदा उपोषणाचं हत्यार उपसणार आहेत. पुढच्या महिन्यातील त्यांचं उपोषण हे शेवटचं उपोषण असणार आहे. म्हणजे जरांगे हे आरपारची लढाई करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या या आंदोलनाकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण मिळावं आणि सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याची अंमलबजावणी करावी या दोन मुद्द्यांवर त्यांचा भर असणार आहे. मात्र, त्यापूर्वीच जरांगे यांनी एक मोठं आणि खळबळजनक विधान केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. मनोज जरांगे पाटील हे धाराशिवमध्ये होते. यावेळी त्यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे बडे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप केला आहे. देवेंद्र फडणवीसांमुळेच सग्यासोयऱ्यांचा मुद्दा प्रलंबित आहे. फडणवीस सगेसोयऱ्यांचा मुद्दा मार्गी लागू देत नाही. राज्यातील मंत्र्यांनाही फडणवीस काम करू देत नाहीत. त्यामुळे सगेसोयऱ्याचा मुद्दा पेंडिंग आहे. पण त्यांचं हे षडयंत्र आम्ही 2024च्या विधानसभा निवडणुकीत हाणून पाडू, असा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.



# तेलगावनाका येथे रास्ता रोको खा. बजरंग सोनवणेंची भेट !

**बीड (प्रतिनिधी):**

शहरातील तेलगावनाका परिसरातील सर्वच भागात रस्ते, वीज, पाणी, नाल्या या नागरी समस्या कायम आहेत. या समस्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी भागवत तावरे यांच्या नेतृत्वाखाली तेलगावनाका येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आला. यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा करुन समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. तेलगाव नाका परिसरातील अनेक भागात रस्ते नाल्या नसल्याने नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो आहे. तसेच पाणीपुरवठा, विजेचा प्रश्न कायम आहे. याकडे कोणाचेच लक्ष नसल्याने लोकपत्रकार भागवत तावरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी एकत्र येत या नागरी समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी आज बुधवारी (दि.४) सकाळी तेलगावनाका येथे तेलगाव रस्त्यावर रास्तारोको आंदोलन केले. यावेळी भागवत तावरे यांनी या भागातील समस्या आणि लोकांच्या भावना खासदार सोनवणे यांच्या समोर मांडल्या तर धनंजय गुंदेकर यांनी बीड-परळी रस्ता थोडाही पाऊस झाला की, चिखलात हरवून जात असल्याचे सांगितले तर येथील खड्ड्यात सुफियान मणियार यांनी पाण्यात झोपून आंदोलन केले. यावेळी खासदार सोनवणे यांनी आंदोलकांशी चर्चा करुन सर्वच प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले. आंदोलकांचे समाधान झाल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर पेठ बीड पोलिसांनी तगडा बंदोबस्त ठेवला होता.

# २२० वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना अकरा कोटींचे विमा कवच

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपक्रमाचे पत्रकारांकडून कौतुक

**बीड/प्रतिनिधी**

दि.४ : शहरातील वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी, वृत्तपत्र विक्रेते अशा एकूण २२० जणांना राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ११ कोटींचे अपघाती विमा कवच दिले आहे. यासंदर्भात बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने विमा वितरणाचा कार्यक्रम घेतला होता. या उपक्रमाचे पत्रकारांकडून कौतुक करण्यात आले. बीडच्या वृत्तपत्र क्षेत्रामध्ये अनेक वर्षांपासून विविध विभागात कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र त्यांना कसल्याच प्रकारचे विमा संरक्षण मिळाले नाही. अत्यंत तुटपुंज्या मानधनावर वृत्तपत्र क्षेत्रातील संगणक विभाग, मशीन ऑपरेटर, कामगार, वृत्तपत्र वाटप करणारे मुले, श्रमिक कामगार काम करत असतात. एखाद्या दुर्घटनेत वृत्तपत्र कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबियांवर मोठे आर्थिक संकट ओढावते. यामुळे वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी, वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांना अपघाती विमा संरक्षण देण्यासाठी



राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला. बीड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत दि.१३ ऑगस्ट रोजी प्राथमिक स्वरुपात कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा काढण्यात आला. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात आतापर्यंत २२० वृत्तपत्र कर्मचाऱ्यांना ११ कोटींचे विमा कवच देऊन डॉ. क्षीरसागर यांनी कायम श्रमिक कर्मचाऱ्यांच्या पाठिशी असल्याने सिध्द केले आहे.

## अतिवृष्टीमूळे जनता त्रस्त! सत्ताधारीं दहीहंडी सारख्या कार्यक्रमात नृत्यांगना नाचवण्यात मस्त!



उमरखेड प्रतिनिधी : अशोक गायकवाड

उमरखेड व महागाव तालुक्यात सलग तीन दिवसाच्या पावसाने नदी व नाल्याला पुर येऊन आजूबाजूच्या गावातील शेतकरी यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे तर गावातील लोकांच्या घरात पाणी शिरून भांडे व खाण्याचे अन्न धान्य वाहून गेले असून लोकांवर उपासमारेची वेळ आली असता त्यांना आधार देण्यासाठी आणखीन प्रशासन मद्दत मिळालेली नाही. उमरखेड -महागाव मतदारसंघात अतिवृष्टीमूळे हा हा!कार माजला असून.

मोठ्या प्रमाणामध्ये शेतकरी उध्वस्त झाला आहे. नदीकाठचं नाल्याकाठच हातचा आलेले सोयाबीन, कापूस , ज्वारी व इतर अन्य पिके नष्ट झाली आहेत. राज्याचे सत्ताधारी नेत्यांनी जनतेची मदत करायला होती तसे न करता दही हंडी महोत्सवात लाखो रुपये खर्च करत आहे .महागाव -उमरखेड तालुक्यातील जनताचे घराचे, मालाचे व आर्थिक नुकसान झाले असून दुःखात आहे पण इकडे गरीब जनतेच्या जखमेवर मीठ चोळल्यागत सत्ताधारी नेते दहीहंडी सारख्या कार्यक्रमात नृत्यांगना नाचवून गरीब जनतेची खिल्ली उडवत असल्याचे बोलले जात आहे.

# लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री शिंदे साहेबांचीच, राष्ट्रवादी अजित पवार गटाने फुकटचे श्रेय लाटू नये- सुनिल सुरवसे

बीड, प्रतिनिधि- तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते सन्मानीय एकनाथजी शिंदे साहेब यांनी सर्व सामान्यांच्या हितासाठी अनेक योजणा अमलात आणल्या आहेत. यापैकीच एक म्हणजे अवघ्या महाराष्ट्रभरात लोकप्रिय ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आहे. महाराष्ट्रात सध्या सुरु असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा महिला भगिनी लाभ घेत आहेत. मात्र या लाभाचा सध्या फायदा फक्त आणि फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार आणि त्यांचा गट घेत असून जनतेसमोर जणू आम्हीच ही योजना सुरु केलेली आहे व यात दुसऱ्या कुणाचे काडीची योगदान नसल्याचे चित्र उभा केले जात आहे.आताच काही दिवसांपूर्वी बीड येथे संपन्न झालेल्या राष्ट्रवादीच्या जनसंवाद यात्रा सभेत देखील अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना ही मीच सुरु केली व सगळं माझ्यामुळेच झालं अशी टिमकी वाजवताना सर्वांनी पाहिलं. परंतु असं काही नसून लाडकी



**राष्ट्रवादीच्या जाहिराती वरून वाद मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना चे नाव बदलून अजित दादा माझी लाडकी बहीण**

बहीण योजनेचे खरे आणि सर्वोपरी हक्कदार माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब हे आहेत आणि जनतेला हे चांगलेच माहित आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सर्वत्र स्वतःच्या नावाचा बोलबाला करून घेत आहे. मुख्यमंत्री साहेबांचे नाव वगळून सध्या अजित दादा चे लाडके बहीण योजना आहे असे सांगून मिरवत आहेत. माझी लाडकी बहीण योजनेचे फुकटचे श्रेय लाटणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि त्यांच्या गटाला बीड जिल्हा शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी पत्रक काढत कडक विरोध दर्शविला आहे.

# अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे नुकसान; पंचनामे करून सरसकट मदत द्या

## राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष बबनराव गवते यांची मागणी, जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

बीड: मागील चार दिवसांपुर्वी बीड मतदारसंघातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली असून यात शेतकऱ्यांचे पिकाचे नुकसान झाले आहेच परंतु नदी काठी असलेली शेतीही खरडून गेली असल्याने शेतीचेही नुकसान झालेले आहे. यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून सरसकट शेतकऱ्यांना मोकळ्या हाताने आर्थीक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष बबनराव गवते यांनी केली आहे. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, चार दिवसांपुर्वी सलग चोवीस तास पाऊस पडला. यात बीड आणि शिरूर तालुक्यातील बहूतांश महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद आहे. सलग झालेल्या पावसामुळे शेतात पाणी साचलेले असून काही ठिकाणी पाण्याचे उपळे लागलेले आहेत. परिणामी, पिकांना पाणी लागलेले असून काढणीला आलेल्या पिकांच्या मुळ्या सडल्या आहेत. पिके पिवळी पडली असून सोयाबीन, उदिड आणि कांद्याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तर काही भागातील नद्यांना महापूर आल्याने नदी काठी असलेल्या शेतजमीनी खरडून गेल्या आहेत. पिकांसह शेतीचेही नुकसान झालेले असून यासोबतच जमीनी खरडून जाताना अनेकांच्या पाईपलाईनही तुटून वाहून गेल्या आहेत. या गोष्टींचा पंचनामे करताना विचार करावा, महसूल प्रशासनाने दोन दिवसात तातडीने पंचनामे करून शासनाला कळवावे आणि विलंब न लावता शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणीही बबनराव गवते यांनी केली आहे. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महादेव उबाळे, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर, पंचायत समिती सदस्य सचिन शेळके, केशव तांदळे, भागवत मस्के, योगेश बहिरवाळ, अप्पा इंदूरे, सचिन घरत, प्रतिक कदम यांची उपस्थिती होती.



# इंफन्ट इंडिया प्रकल्प पाली येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर

बीड, दि. 4 :- प्रत्येकाला चांगले व आनंदी आयुष्य जगता येण्यासाठी जगताना आयुष्याकडे सकारात्मक पद्धतीने बघने गरजेच असल्याचे प्रतिपादन जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आनंद यावलकर यांनी किमान समान कार्यक्रम अंतर्गत आजारग्रस्तांसाठी समुपदेशन या विषयांवर बोलतांना म्हणाले.

बुधवारी इंफन्ट इंडिया प्रकल्प, पाली येथे कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी, मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक महेश तोष्णीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणुन श्री तोष्णीवाल यांनी उपस्थितांच्या अडचणी जाणून घेत त्यांना आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन निराशात्मक न ठेवता सकारात्मक ठेवण्यास सांगितले. त्यांचा आत्मविश्वास व मानसिक स्थिती बळकट व्हावी या विषयांवर समुपदेशन केले. यासोबतच एचआयव्ही ॲक्ट 2017 याबद्दल देखील माहिती दिली. संबंधीतांना कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा शाळेत येण्यासाठी आडवले जाऊ शकत नाही. सामान्य मानवाप्रमाणेच त्यांना देखील मुक्तपणे जगण्याचा अधिकार आहे. हे सांगत त्यांना आनंदी आयुष्य जगण्यासाठी प्रोत्साहन दिले. संबंधीतांच्या आजाराविषयीची माहिती ही गोपनीय ठेवली जाते. हे देखील समुदेशन करताना सांगितले. नॅको ही संस्था त्यांना कोणत्या प्रकारे मदत करू शकते याबद्दल देखील माहिती दिली. सदरील कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत अशोक तांगडे, तत्वशील कांबळे आणि प्रशिक्षणार्थी म्हणून असलेले नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील विद्यार्थी सुयष आघाव, राजवीर चेमटे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी उपस्थित होते.

## संभाजी ब्रिगेडच्या बीड पश्चिम जिल्हाध्यक्षपदी प्रा शशिकांत कन्हेरे यांची निवड



आष्टी:- संभाजी ब्रिगेडच्या बीड पश्चिम जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते संभाजी ब्रिगेडची मुलूख मैदानी तोफ प्रा शशिकांत कन्हेरे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष ॲड मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर यांच्या आदेशानुसार निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहणा-या प्रा कन्हेरे यांची थेट बीड पश्चिम जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने बीड जिल्हयात आनंद व्यक्त केला जात आहे. मराठवाडासह बीड जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडचा विचार सर्वदूर पोहोचविला.प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सामाजिक बांधिलकी मानून केलेले कार्य तसेच ते अनेक वर्षांपासून पुरोगामी चळवळीत सक्रिय आहेत. त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल या सर्व कार्याची दखल घेऊन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी प्रा शशिकांत कन्हेरे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करून त्यांना शुभेच्छा दिल्या.दरम्यान आपल्या निवडीविषयी आभार मानून बोलताना प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले की,संभाजी ब्रिगेडचे संघटन वाढीवर भर देणार आहोत. समाजातील प्रश्न सोडविणार आहोत.तसेच सामान्य माणसांवर होणा-या अन्याय-अत्याचारा विरूद्ध लढण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून 24 तास जनसेवेसाठी उपलब्ध असेन असे नवनिर्वाचित बीड जिल्हाध्यक्ष प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले.त्यांच्या या निवडीबद्दल प्रदेश संघटक डॉ सुदर्शन तारक,विभागिय अध्यक्ष ॲड राहुल वायकर,मराठा सेवा संघाचे आष्टी तालुकाध्यक्ष इंजिनिअर तान्हाजी जंजीरे याच्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते व आदींनी अभिनंदन केले आहे.

## युवा नेते ॲड.महेश भैय्या धांडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा



बीड प्रतिनिधी : शहरातील युवा नेते व सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश धांडे यांचा आज मंगळवार तीन सप्टेंबर रोजी बीड शहरामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहातज्ञ वाढदिवस साजरा करण्यात आला. त्या उपक्रमामध्ये शहरातील बार्शी नाका अशोक नगरबीड प्रतिनिधी : शहरातील युवा नेते व सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश धांडे यांचा काल मंगळवार तीन सप्टेंबर रोजी बीड शहरामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला. लोकमित्र परिवारातर्फे शहरातील बार्शी नाका अशोक नगर येथील केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले व शाळेतील मुलांना 200 विविध प्रकारचे झाडांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते स्वप्निल भैया गलधर यांची प्रमुख उपस्थिती लाभली स्वप्निल भैया गलधर, ॲड महेश भैया धांडे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कमल लांडगे मॅडम, केंद्रप्रमुख श्री हकीम मणियार सर, संपादक शेख ताहेर, उपसंपादक शेख वसीम, शेख सरफराज ( सोनू भैय्या ) यांच्या हस्ते शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले व शाळेतील मुलांना वृक्षारोपणासाठी प्रोत्साहित करून झाडांचे महत्व समजावून सांगत 200 झाडांचे वाटप करण्यात आले. यावेळी स्वप्निल भैया गलधर, महेश भैया धांडे, मुख्याध्यापिका श्रीमती कमल लांडगे मॅडम, केंद्रप्रमुख श्री हकी मणियार सर, संपादक शेख ताहेर, उपसंपादक शेख वसीम, शेख सरफराज,गणेश काशीद,सुमीत धांडे,सचीन आगे व शाळेतील शिक्षक व शिक्षिका प्रमुख पणे उपस्थित होते

## बीड शहरात इकोफ्रेंडली शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीची आज कार्यशाळा

### बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची माहिती

बीड (प्रतिनिधी) दि.४ : येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटकसंस्था असलेली बालरंगभूमी परिषद बीड जिल्हा शाखेतर्फे आज (दि.५) सकाळी १०.३० वाजता इकोफ्रेंडली-शाडू मातीच्या गणेशमुर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात येणार असल्याची माहिती बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांनी दिली आहे.

बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा बीड.

सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या परिसरात होणाऱ्या कार्यशाळेत शाळेच्या ६ ते १५ वयोगटातील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवावा. गणेश मुर्तीसाठी माती उपलब्ध करून दिली जाईल. सहभागी कलावंताना सहभाग प्रमाणपत्र दिले जातील. याशिवाय विद्यार्थ्यांनी बनविलेला गणपती त्यांना घरी नेता येईल. पर्यावरणपूरक गणेश उत्सव व्हावा, हा उद्देश समोर ठेवून बीड बालरंगभूमी परिषद उपक्रम राबवत आहे. या आधी देखील छत्री रंगवा, लोकवाद्य प्रशिक्षण, प्रदर्शन, बाल कलावंतासाठी लोककला महोत्सव व स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. बाल प्रेक्षक सभासद योजना देखील सुरू आहे. तरी गणपती बनवा कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, शाहीर विलास सोनवणे, सुरेश साळूंके, दीपक जमधाडे, अमित गाडे, विजय राख, अनुराधा चिंचोलकर, डॉ.विश्वांभर देशमाने, अक्षय फुलझळके आदींनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. दीपक जमधाडे 8888850358, अमित गाडे 8888955792 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# मराठा सेवा संघ हे माणुस सक्षम बनविण्याचे केंद्र- इंजि.पाटील

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ व सर्व कक्षाच्या वतीने मराठा सेवा संघाचा चवतीसाव्या वर्धापन दिन यशवंराव चव्हाण मराठा मुलांचे वसतिगृह नांदेड येथे साजरा करण्यात आला यावेळी एक पताकी भगव्या ध्वजाचे ध्वजारोहन करुन राष्ट्रमाता जिजाऊ मॉं साहेब यांना अभिवादन करुन कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.

मराठा सेवा संघाने महाराष्ट्रातच नाहीतर जगभरात जिजाऊ-फुले-शाहु-आंबेडकर विचारधारा जनसामान्यांपर्यंत नेऊन पोंहचवीली युवकांचा मन-मनका-मनगट-मेंदु-मस्तक सशक्त करण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले.मराठा सेवा संघाच्या विचारधारेमुळे,प्रबोधनामुळे जातीजातीतील,धर्माधर्मातील दंगली बंद झाल्या माणुस सक्षम बनविण्याचे केंद्र झाले असे मत मराठा सेवा संघाचे प्रशिक्षक इंजि.शिवाजीराजे पाटील यांनी व्यक्त केले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता मा.इंजि सोनवणे,प्रा व्यंकटराव कोनाळे, प्रल्हादराव कऱ्हाळे, पंडीतराव पवळे, भगवाणराव ताटे यांच्या कार्याबध्दल मराठा सेवा संघातील विशेष योगदाना बध्दल सेवा पुर्तीबध्दल मान्यंवराच्या हस्ते सन्मान करण्यात आला.ॲड. युगनायक पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघाची स्थापना करुन मॉं साहेब जिजाऊला सर्वौच्य स्थान देऊन स्रित्वाचा सर्वोच्य सन्मान व जिजाऊ-फुले-शाहु-आंबेडकर यांचे विचार जनमानसात मराठा सेवा संघ व सर्व कक्षांच्या वतिने गेले पाहिजे तळागळातला खेड्यापाड्याचा माणुस शैक्षणिक सामाजिक प्रगत होऊन स्वाभिमाने जिवन जगला पाहिजे यविचाराने मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड यासह इतर कक्षांची स्थापना करुन महाराष्ट्राला नव्हे तर देशाला नवी दिशा दिली असे



मत आपल्या प्रास्ताविकात मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष उद्धव सुर्यवंशी यांनी मांडले.मराठा सेवा संघाचे प्रदेश सहसचिव प्रा.डॉ.पंजाबराव चव्हाण हे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. यावेळी मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष इंजि.लिंबराज सूर्यवंशी विभागीय अध्यक्ष शे.रा.पाटील, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष शिवाजीराव खुडे,इंजि.सुरेश शेळके, इजि.व्हि. टी. शिंदे,इंजि.शिवाजी राजे पाटील, प्रल्हादराव दुरपडे, पि.के. कदम, बळीराम फाजगे, प्रा.राधाकृष्ण होगे, सुनिल कदम,केशव पाटील जिजाऊ ब्रिगेड विभागीय अध्यक्षा डॉ. विद्या पाटील,अरुणा जाधव, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुमित्रा वडजकर, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष कल्पंना चव्हाण, रेणुका कौशल्य, वनिता देवसरकर,मिनाक्षी पाटील,संजिवनी सुर्यवंशी, संभाजी ब्रिगेड माजी प्रदेश उपाध्यक्ष ॲड.बालाजी वाघमारे,ॲड. बालाजी शिरफुले, संभाजी ब्रिगड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील,सभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे,भगवाण कदम,परमेश्वर पाटील, वि.बि.वि.पी. जिल्हाध्यक्ष इंजि. प्रविण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.मराठा सेवा संघाचे उत्तर जिल्हाध्यक्ष नानाराव कल्याणकर यांनी आभार मानले.सामुहीक जिजाऊ वंदना घेण्यात आली कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मराठा सेवा संघाचे सचिव ॲड सतिश जाधव यांनी केले मोठ्या संखेने मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेड व सर्व कक्षांचे आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते वसतिगृहातील विद्यार्थी समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीमती. मसरत सुलताना अन्सारी यांना शिक्षण महर्षी डॉक्टर जाकिर हुसेन पुरस्कार जाहीर

**बीड प्रतिनिधी**

: महाराष्ट्रात कदाचित पहिल्यांदाच फक्त अल्पसंख्यांक समाजातील गुणवंत शिक्षकांचा ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, शिक्षण महर्षी, मुस्लिम समाजातील पहिले आणि भारताचे तिसरे राष्ट्रपती डॉ. जाकेर हुसैन या आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या नावाने मान्यवरांच्या उपस्थितीत गुरुवार दिनांक 5 सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक म्हणून अल्पसंख्याक समाजातील गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील 11 तालुक्यातून गुणवंत शिक्षकांची निवड केली असल्याचे आयोजक वैभव स्वामी, संपादक दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार शेख आयेशा, अध्यक्ष आश्रय सेवा केंद्र यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.



भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉक्टर राधाकृष्णन सर्वपल्ली यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून 5 सप्टेंबर रोजी सर्वत्र शिक्षक दिन साजरा केला जातो. या निमित्ताने शासन आणि प्रशासनाच्या वतीने आदर्श शिक्षकांना दरवर्षी जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, आणि राष्ट्रपती स्तरावर गौरवले जाते. विविध संस्था,पक्ष यांच्या वतीने गुणवंत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करतात. मात्र कदाचित महाराष्ट्रामध्ये आज पर्यंत फक्त अल्पसंख्यांक समाजातील आदर्श शिक्षकांचा गुणगौरव सोहळा झालेला नसावा, ही बाब लक्षात घेऊन दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक 5 सप्टेंबर रोजी शिक्षण महर्षी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या शुभहस्ते अल्पसंख्याक समाजातील गुणवंत शिक्षिका श्रीमती. मसरत सुलताना अन्सारी यांना डॉ. जाकेर हुसैन आदर्श शिक्षक या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच या पुरस्काराचे वितरण होणार असून या अनोख्या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा तथा साप्ताहिक शिववाणीच्या संपादक शेख आयेशा यांनी केले आहे. यावर्षीपासून पहिल्यांदाच आदर्श शिक्षक पुरस्काराचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या पहिल्या वर्षी बीड शहरातील मिलिया प्राथमिक मुलींची शाळा भालदारपुरा बीड, या शाळेतील सहशिक्षिका श्रीमती. मसरत सुलताना अन्सारी डॉ.जाकिर हुसैन आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरल्या आहेत, पुरस्कारार्थींना शिक्षक दिनी मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीमती. मसरत सुलताना अन्सारी, यांचा सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## प्रयास फाउंडेशन घेऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सीमा डोंगर पट्ट्यात.

# तीन महिन्यात ७० हजार वह्या, प्रत्येकी २० पेन्सिल,शॉपनर, पेन चे यशस्वी केलें वाटप .



बीड । प्रतिनिधी

गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित "प्रयास फाउंडेशन मुंबई "यांच्या सहकार्याने बीड तालुक्यातील ग्रामीण भाग, डोंगर डोंगरपट्ट्यातील जिल्हा परिषद शाळेत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत. गेल्या जून- जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्याचा कालखंडात बीड तालुक्यातील जवळपास १४२ जिल्हा परिषद शाळेमध्ये सरसकट विद्यार्थ्यांना ७० हजार वह्या,वीस हजार पेन, वीस हजार पेन्सिल, वीस हजार शॉपनर यशस्वीरित्या विविध सामाजिक, राजकीय ,शैक्षणिक, प्रतिष्ठित नागरिक, क्रीडा ,उद्योग, व्यापार, उद्योजक, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी अशा मान्यवरांच्या हस्ते मोफत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात डोंगरपट्ट्यातील जिल्हा परिषद शाळा टिकावी. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी त्यांचा शिक्षणाचा दर्जा सुधरावा यासाठी विशेष करून "गुरु आनंद महिला प्रतिष्ठान "बीड आयोजित "प्रयास फाउंडेशन मुंबई" यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सरसकट वह्या ,पेन ,शॉपनर, पेन्सिल, ते मोफत वाटप केले आहे. या तीन महिन्याच्या कालखंडात ग्रामीण भागातील डोंगर पट्ट्यातील विद्यार्थ्यांना सुद्धा शिक्षण साहित्य मोफत देण्यासाठी यशस्वी ठरल्या "सीमा ओस्तवाल."ह्या गेल्या तीन महिन्यापासून जिल्हा परिषद शाळेतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दैनंदिन शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात यशस्वी झाले आहेत. या तीन महिन्याच्या कालखंडात मान्यवरांच्या हस्ते अनेक जिल्हा परिषद शाळेत मोफत शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना देताना सहकार्य लाभले.

## कापसाच्या मर रोगावर तात्काळ उपायोजना करा:- राजेंद्र आमटे

### शेतकऱ्याचे वाटोळ तरी वांझोटा कृषी विभाग शांत का? शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे निवेदन



बीड (प्रतिनिधी) शेतकऱ्याने पोटच्या पोरा पेक्षा जास्त जपलेलं कापसाचे पीक अचानक आलेल्या मर रोगा मुळे नेस्तनाबूत होत आहे. शेतात उभे असणारे एककर दोन दोन एक्कर पीक जमिनीला भुई सपाट होत आहे. आणि आपला वाझोटा कृषी विभाग शेतकऱ्याच्या कापसाच्या पिकाचे वाटोळे होत असताना शांत का? कृषी विभागाने तातडीने उपाय योजना करून कापसावर झालेल्या मर रोगावर नियंत्रण करावे कृषी विभाग मार्फत शेतकऱ्यांना तत्काळ रोग नियंत्रण साठी मदत देण्यात यावी मर रोगामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान तत्काळ थांबवण्यासाठी कृषी विभागाने उपाय योजना कराव्यात या मागणी साठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय निवेदन देण्यात आले लवकरात लवकर शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई चे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा शिवसंग्राम शेतकरी आघाडी वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सरचिटणीस सुहास पाटील, शेलेश सुरवसे, रामचंद्र बरडे, अच्युत सुरवसे, राम



सपकाळ, सुधाकर काकडे, संजय तीपाले, रमेश जगताप, सुभाष सपकाळ, मोहन गव्हाणे, कृष्णा मसुरे आदीच्या स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण

**लातूर । प्रतिनिधी**

उदगीर येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, विशेष अतिथी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, रमेश





कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचीही उपस्थिती होती.

सुरुवातीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्कूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू चिवर दान केले. बौद्ध भिक्कू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री बनसोडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

विहाराची वैशिष्ट्ये

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झालेले उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहे. या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.

## जगातील मुस्लिम धर्मीयांचे श्रद्धास्थान प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या सन्मानासाठी आशिके रसुलफकायदा बनविण्याची मागणी

जालना । असलम कुरेशी

जगातील मुस्लिम धर्मीयांचे श्रद्धास्थान, आदरस्थान प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या सन्मानासाठी कायदा बनविण्याची मागणी युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे मंठा तालुक्यातील पांगरी दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की प्रेषित मोहम्मद पैगंबर हे जगातील इस्लाम धर्म मानणारे तसेच सर्व मानवतेचे विचार पाळणारे यांचे श्रद्धास्थान व आदरस्थान आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेबांनी अहिंसा, प्रेम व माणुसकीचा संदेश संपूर्ण जगाला दिला आहे. आम्ही त्यांच्या विचारांचे मानणारे सर्व अहिंसावादी व माणुसकी बाळगणारे लोक आहोत. मात्र, दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याच्या हेतूने आणि दंगली घडवून आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी काही राजकीय पक्ष वारंवार कोणत्याही समाजकंटकांना सुपारी देऊन प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेबांविषयी चुकीची माहिती प्रसारित करणे, अपमान करणे, टिंगलटवाळी करणे अशा प्रकारचे प्रकार दिवसेंदिवस आपल्या राज्यात वाढत आहेत. यामुळे बहुतांश वेळा जातीय तेढ निर्माण होत आहे. परंतु मुस्लिम समाजाने समजदारीने व संयमाने यावर प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. येथे सर्व समाजाचे, सर्व धर्मीय लोक आपुलकीने आणि प्रेमाने राहणारे आहेत. मात्र आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळिमा लावणारे हे प्रकरण गंभीर आहे. यावर आळा घालण्यासाठी आपण पुढाकार घेऊन, आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्या घोषणापत्रात 'आशिके रसूल कायदा' चा उल्लेख करावा. तसेच, आपले सरकार आल्यावर सदर कायदा मंजूर करण्यात यावा, ही विनंती आहे. सदर कायद्यात प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेब व सर्व महापुरुषांचा अनादर करणाऱ्या, चुकीची माहिती प्रसारित करणाऱ्या, टिंगलटवाळी करणाऱ्या, अपशब्द वापरणाऱ्या आणि दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांना कठोर शिक्षेची तरतूद करावी, ही विनम्र विनंती. तसेच नितेश राणे नावाचा एक व्यक्ती महाराष्ट्राच्या सामाजिक सलोख्याला धक्का पोहोचवत आहे. हा व्यक्ती दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात द्वेष



पसरवण्याचा प्रयत्न करतो आहे. सदर व्यक्तीला आळा घालण्यासाठी आपण प्रयत्न करावेत, ही विनंती आहे. यावेळी मोहसीन कुरेशी, इस्माईल राज, जुनेद खान, सय्यद अज़मत आदी उपस्थित होते.

## शेतक-यांना उसाचे पेमेंट व दुसरा हप्ता द्यावा अन्यथा जय भवानी कारखान्यावर मोर्चा

### बदामराव पंडित यांचा इशारा

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने आणि पावसाच्या प्रतिकूल परिस्थितीत उसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले आहे. यातील काही शेतकऱ्यांनी जय भवानी सहकारी साखर कारखान्याला ऊस गाळपासाठी दिलेला आहे. मात्र त्यातील काही शेतकऱ्यांना अद्यापही उसाचे पैसे मिळालेले नाहीत, ते तात्काळ द्यावेत. त्यासोबतच सणासुदीचे दिवस असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाचा दुसरा हप्ता द्यावा नसता जय भवानी साखर कारखान्यावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह मोर्चा काढण्यात येईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिला आहे.

गेवराई तालुक्यात गेल्या चार दिवसापासून जोरदार पाऊस झाला असून शेतामध्ये पाणी साचल्याने उभ्या पिकाला मोठा धोका निर्माण झाला आहे. संबंधित शेतकऱ्याला धीर देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी तालुक्यातील अनेक गावांमध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची पाहणी केली. संबंधित शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसानीबाबत तात्काळ पंचनामे करावेत, याबाबत अधिकाऱ्यांशीही संपर्क साधला.



यावेळी पत्रकारांशी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाण्याची तळे साचले आहेत. हे पाणी लवकर शेतातून बाहेर पडेल अशी स्थिती नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाची अतोनात नुकसान झाले आहे. याच स्थितीत वेगवेगळे सण आल्याने शेतकरी सुद्धा हवालदिल होत आहे. शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी तालुक्यातल्या जय भवानी सहकारी साखर कारखान्याला गाळपासाठी आपला ऊस दिलेला आहे, त्या शेतकऱ्यांचे उसाचे पेमेंट तात्काळ देण्यात यावे. त्यासोबतच सणासुदीचे दिवस आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने उसाचा दुसरा हप्ताही शेतकऱ्यांना देण्यात यावा, नसता जय भवानी सहकारी साखर कारखान्यावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विराट मोर्चा काढण्यात येईल असा सज्जड इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिला आहे. उसाचा दुसरा हप्ता पोळा सणाच्या पूर्वीच शेतकऱ्यांना देणे गरजेचे होते मात्र त्यांच्या अडीअडचणीची जाणीव जय भवानी सहकारी साखर कारखाना चालणाऱ्या आणि कार्यकर्ते फोडाफोडीत व्यस्त राहुल सत्तेसाठी हापापलेल्या विरोधकांना नाही याची खंत वाटते असेही ते म्हणाले. यावेळी शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## चौसाळा येथे गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मुलींना स्वरक्षणाचे मार्गदर्शन

चौसाळा । प्रतिनिधी

गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा या ठिकाणी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या परिपत्रकानुसार शाळेमध्ये सखी सावित्री समितीची स्थापना करण्यात आली या समितीचे सचिव मा. मुख्याध्यापक श्री श्रीमंतराव चौधरी सर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थीसुरक्षा चर्चा सत्राचेआयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समिती सदस्य संभाजी (आबा) जोगदंड व चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक (बाबा) कुचेकर यांनी स्थान भूषविले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर घोडके सर ,मोठे सर ,वैद्य सर, गुरव सर लिमकर सर मंचावर उपस्थित होते या समितीच्या महिला सदस्य श्रीमती साबणे जयमाला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की मुलींनी आपल्या शाळेमध्ये साजऱ्या केल्या जाणाऱ्या ऐतिहासिक स्त्रिया समाजसेविका देशभक्त क्रांतिकारक स्त्रियांच्या जयंत्या आणि पुण्यतिथी याच्या तून काही प्रेरणा घेतली पाहिजे अनेक स्त्रियांनी स्व संरक्षणाबरोबरच देश रक्षणाचं कार्य केलं आहे. मग त्या अहिल्याबाई होळकर असतील ,झाशीची राणी लक्ष्मीबाई असतील, महाराणी ताराबाई असतील अशा विरांगणा वारसा आपल्याला लाभलेला आहे .त्याचा वसा आपण घेतला पाहिजे संकटाच्या वेळी डोक्यावरचा पदर डोळ्याला लावून रडत बसण्यापेक्षा तोच पदर कमरेला खोचून पुरुषप्रधान संस्कृतीमधील वासनांधतेला ठेचून काढलं पाहिजे स्त्रीने आज प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीने नव्हे तर एक पाऊल पुढे जाऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे मग ते आरोग्य क्षेत्र ,संरक्षण क्षेत्र ,अंतराळ क्षेत्र असो, उद्योग क्षेत्र असो की ,व्यापार असो प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे म्हणून तुम्ही मुलींनी तुमच्यातील न्यूनगंड बाजूला सारून आत्मनिर्भर झालं पाहिजे. स्वतःचं आत्मरक्षण आणि आत्मपरीक्षण स्वतः केलं पाहिजे कोणत्याही आमिषाला भूलथापांना बळी न पडता सतर्क आणि सावध असलं पाहिजे. मोबाईल इंटरनेट हे सर्व मायाजाळ आहे. याचे खूप दुष्परिणाम पाहायला मिळतात




त्यामुळे त्यातील जे चांगलं ज्ञान आहे ते आपण घेतलं पाहिजे. तसेच साबणे मॅडम यां मुलींना असे म्हणाल्या की मुली आता कुठेही सुरक्षित नाहीत .एखाद्यावर विश्वास टाकून मुलींनी एकटे कोणाबरोबरही जाऊ नये ,समाजात सगळेच लोक वाईट नसतात समाजात स्त्रियांचा आदर व सन्मान करणारे लोक सुद्धा आहेत अशावेळी मुलींना चांगला वाईट स्पर्श ओळखता आला पाहिजे कुठलीही गोष्ट शिक्षकापासून आई-वडिलांपासून लपवून ठेवू नये जेणेकरून पुढील एखादा वाईट प्रसंग टाळता येईल मुलींनी आता स्वरक्षणाची जबाबदारी स्वतः घ्यायला हवी प्रत्येक वेळी आपल्याबरोबर पालक असतीलच असे नाही प्रत्येक मुलींना कराट्याच्या शिक्षणाची आवश्यकता आहे चांगल्या शिक्षणाबरोबर आपले आरोग्य सुद्धा चांगले ठेवले पाहिजे. स्वहित जपता आले पाहिजे एखाद्या वाईट प्रसंगा नंतर प्रत्येकाला त्यातून उभे राहता आलं पाहिजे आपल्या रक्षणाची जबाबदारी आता आपणच घेतली पाहिजे आपल्या जवळ आता पावडर लिपस्टिकच्या ऐवजी आपल्या पर्समध्ये मिरची पूड स्प्रे आणखी शिवरायांसारखी वाघ नखे जवळ बाळगण्याची गरज आहे अशा प्रकारे श्रीमती साबणे मॅडम यांनी आपल्या अमोघ वाणीतून परखड शब्दात सर्व मुलींमध्ये एक नवचेतना निर्माण केली आणि शेवटी इतनी शक्ती हमे देना दाता 1 मन का विश्वास कमजोर हो ना 1 हे गीत विद्यार्थ्यांनी गायले व या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या खुमाशदार शैलीत श्री राठोड सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी टाचतोडेबाई, विश्वनाथ पवार ,धनंजय वाघमारे ,संजय सोनवणे , व पवार बाई यांनी मोलाचे सहकार्य केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

गुरुवार ५ सप्टेंबर २०२४ | पान क्रं - ४ PAGE NO 4




# सर्व धर्म समभाव नव्हे तर सर्व हिंदू समभाव म्हणा..
# मिलिंद एकबोटे यांचे केज येथे वादग्रस्त वक्तव्य

**केज ।प्रतिनिधी**

सर्व धर्म समभाव ही लाजिरवाणी गोष्ट असून सर्व हिंदू समभाव असे वादग्रस्त वक्तव्य मिलिंद एकबोटे यांनी केज हिंदू जनजागरण मोर्चात बोलताना केले. तर हिंदूंनी हिंदूंच्या व्यवसायाला मदत करा. असेही ते म्हणाले. दरम्यान त्यांचे हे वक्तव्य जाती धर्मातील तेढ निर्माण करणारे आहे. शिवाजी महाराजांचा पुतळा पडला म्हणून ओरडणारे महाविकास आघाडीचे शिवाजी महाराज यांच्यावर पुतना मावशीचे प्रेम असल्याचा घणाघात त्यांनी महाविकास आघाडीवर केला. मिलिंद एकबोटे यांच्या मोर्चाला विरोध करणारे दलीत अन्याय अत्याचार विरोधी समितीच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी नजर कैदेत ठेवून स्थानबद्ध केले. दि.४ ऑगस्ट रोजी केज येथे हिंदू जनजागरण सभेच्या वतीने बांगला देशातील हिंदुवर झालेल्या अन्याय-अत्याचार आणि हत्याकांडाच्या विरोधात हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा भवानी माता मंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज चौका पर्यंत निघाला. या वेळी छत्रपती शिवाजी चौकात झालेल्या जाहीर सभेत बोलताना मिलिंद एकबोटे यांनी देशाच्या सर्व धर्म समभाव



यावर बोलताना वादग्रस्त विधान केले ते म्हणाले की, सर्वधर्म समभाव हे चुलीत घाला आणि आता सर्व हिंदू समभाव आणि सर्व हिंदू ममभाव असे म्हणा. तसेच त्यांनी बांगला देशाची फाळणी करून भारताने त्यांच्यावर उपकार केले या उपकाराची त्यांना जान नाही. बांगला देशात शहीद झालेले हिंदूंनी मरण पत्करले पण धर्म सोडला नाही. नरेंद्र मोदींनी हिंदू हत्याकांड थांबविण्याची बांगला देशाला ताकीद दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भारत पाक फाळणी दरम्यान मांडलेले विचार ऐकले असते तर ही वेळ आली नसती याचा उच्चार केला. छत्रपती शिवाजी महाराज यांनी मंदिर तोडून मस्जिद जिथे बांधली तेथे पुन्हा मंदिर बांधल्याचा उल्लेख केला. शिवाजी महाराज यांच्या पडलेल्या पुतळ्याचे महाविकास आघाडी हे राजकारण




करीत असून त्यांचे शिवाजी महाराज यांच्या विषयीचे प्रेम हे पुतणा मावशीचे असल्याची टीका त्यांनी महविकास आघाडीवर केली. तसेच त्यांनी गोहत्या बंदी, लव्ह जिहाद, लँड जिहाद आणि यावर भाष्य केले आणि शिवाजी महाराज यांचे नाव वापरणे चुकीचे असून हिंदूंनी हिंदूची व्यवसाय वृध्दी होण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. जर ल जिहाद, धर्मांतरण, गो हत्या आणि लँड जिहाद थांबले नाही तर भारत दुबळा होईल अशी भीती व्यक्त केली. तसेच यावेळी संग्राम भंडारे महाराज यांनी काही धर्मातील जास्त अपत्ये जन्माला.घातली जात आहेत त्यांच्या बाबतीत लोकसंख्या नियंत्रण कायदा जर लागू झाला नाही तर हिंदूंनी देखील अनेक अपत्यांना जन्म घालावा त्यांची जबाबदारी मी घेतो असे बेकायदेशीर वक्तव्य केले. आणि हिंदू धर्म रक्षणासाठी तरुणांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी हभप नरसिंह महाराज, हभप सूरज महाराज, अतिष दुसाने आणि मोरताळे महाराज यांनीही मोर्चाला संबोधित केले. या मोर्चाला मोठ्या संख्येने तरुण वर्ग उपस्थित होता. तर मान्यवरांच्या हस्ते तहसीलदार राजेश गिड्डे यांना निवेदन देण्यात आले.

### पोलिसांचा तगडा बंदोबस्त ! :-

मलिंद एकबोटे यांना दलीत संघटना विरोध करणार असल्याची माहिती मिळाल्या वरून पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, सहाय्यक पोलीस अधीक्षकांकडे मीना आणि पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस उपनरीक्षक आनंद शिंदे यांच्यासह धारूर, युसुफ वडगाव येथील पोलीस आणि दंगल नियंत्रण पथक असा तगडा बंदोबस्त होता. तसेच ड्रोन कॅमेऱ्यांची नजर होती.

### विरोध करणारे कार्यकर्ते नजरकैदेत ! :-

मिलिंद एकबोटे हे भीमा कोरेगावच्या दंगलीतील आरोपी असल्याने यां मोर्चाला विरोध करण्यासाठी दोन दिवसापूर्वी कार्यकर्त्यांनी निवेदन दिले होते. त्यामुळे खबरदारी म्हणून पोलिसांनी दलीत अन्याय अत्याचार विरोधी समितीचे कार्यकर्ते लखन हजारे, योगेश गायकवाड, सुमित शिंदे, अशोक गायकवाड, शरद धिवार, ऋषीकेश उर्फ आण्णा सोनवणे, प्रवीण मस्के, धीरज मस्के यांना पोलिसांनी नजर कैदेत ठेवून स्थानबद्ध केले. कार्यक्रम संपल्या नंतर त्यांना सोडून देण्यात आले.


# क्रॉप इन्शुरन्स व पंचनामा करण्यासाठी शेतकऱ्यांची लूट...!
### विमा प्रतिनिधींनी पैशाची मागणी केल्यास संपर्क साधावा- महेश सावंत



( बीड प्रतिनिधी ) गेली पाच सहा दिवसांपासून महाराष्ट्रासह मराठवाड्यामध्ये संततधार पाऊस पडत असून, काही ठिकाणी अतीवृष्टी झाली आहे. बीड तालुक्यातील सर्व मंडळामध्ये भरपूर पावसाची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले असून, कापूस, सोयाबीन, उडिद, बाजरी, तुर आदी मुख्य पिके धोक्यात आली आहेत. शासनाने शेतकऱ्यांचा मोफत विमा भरला असून, नुकसान झाल्यास पाऊस पडल्यापासून 72 तासाच्या आत विमा कंपनी व शासन स्तरावरून क्रॉप इन्शुरन्स वर नुकसानीच्या तक्रारी करण्यासाठी कळवले जात आहे. परंतु विमा कंपनीचे कर्मचारी यांच्याकडून क्रॉप इन्शुरन्स व पंचनामा करण्यासाठी शेतकऱ्यांकडून आर्थिक लूट चालू असल्याची माहिती शेतकऱ्यांकडून मिळत आहे. सदरील कामासाठी विमा प्रतिनिधी किंवा इतर कोणीही शेतकऱ्यांनकडून पैशाचे मागणी करत असेल तर संपर्क करावा. लवकरच जिल्हा कृषी अधिकारी यांना भेटून सविस्तर निवेदन देणार असल्याची माहिती महेश सावंत यांनी दिली आहे.. संपर्क क्रमांक_ 9325109474

# कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांना टोल माफी

रायगड जिमाका दि. ०४ : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना गुरुवार दि. ५ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर या कालावधीत पथकर (टोल) माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यासंबधीचा शासन निर्णय मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर प्रसिद्ध करण्यात आला आहे. मुंबई – बंगळुरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यांवर ही सवलत लागू असणार आहे. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दि.१४ ऑगस्ट रोजी झालेल्या गणेशोत्सव पूर्वतयारी आढावा बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते, त्यानुसार आज सार्वजनिक बांधकाम विभागाने पथकर सवलतीचा शासन निर्णय जारी केला आहे. या टोलमाफी सवलतीसाठी 'गणेशोत्सव २०२४, कोकण दर्शन' अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते स्टीकर्स आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधित प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावेत, असे आदेश देण्यात आले आहेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरीता देखील ग्राह्य धरण्यात येईल. तसेच गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना ही टोल माफी लागू असणार आहे. गणेशोत्सवासाठी ज्या जिल्ह्यातून बसेस येथील त्या ठिकाणच्या पोलीस किंवा आरटीओ यांच्याकडून हे पास एसटी महामंडळाला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना देण्याच्या देखील सूचना आहेत.
0000



पाटोदा तालुक्यातील उखंडा येथील तलाव
सौजन्य सुशांत काशिद फोटोग्राफर




पिठी गावामध्ये मा जिल्हाधिकारी मॅडम यांनी भेट दिली व विविध विकास कामाची पाहणी करून सरपंच यांच्या कामाचे कौतुक केले. तर

# नवगण महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ मधुकर आघाव यांची निवड

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये गेल्या 28 वर्षापासून प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे डॉ मधुकर आघाव यांची नुकतीच महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

परळी तालुक्यामध्ये राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये डॉ आघाव यांची यशस्वी वाटचाल राहिलेली आहे. वैद्यनाथ उद्योग समूहाचे चेअरमन म्हणून त्यांनी अनेक फॉर्म यशस्वी चालविल्या आहेत. जिल्हा परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केलेले आहे. वाणिज्य विषयांमध्ये डॉक्टरेट पदवी मिळाल्यानंतर त्यांची वाणिज्य व इतर सांस्कृतिक क्षेत्रातील काही पुस्तके प्रकाशित आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या प्रशासकीय



कामांचा लाभ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी व्हावा व संस्थेची जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडावी म्हणून क्षीरसागर कुटुंबीयांनी त्यांच्यावर विश्वास दर्शविलेला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पालकमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच संस्थेचे सचिव डॉ भारतभुषणजी क्षीरसागर संस्थेच्या मार्गदर्शक डॉ दीपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष युवा नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ सारिकाताई क्षीरसागर तसेच नवगण महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे डॉ अनिल घुगे, श्री बाळासाहेब देशमुख, श्री उदगीरकर, संस्थेच्या प्रशासकीय समितीचे श्री देशमाने सर, श्री गुट्टे सर, उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे इत्यादींनीही त्यांच्या या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे. डॉ आघाव यांच्या निवडीमुळे परळीच्या शैक्षणिक वातावरणात उत्साह दिसून येत असून महाविद्यालयाच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादकः राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com